# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २३/०४/२०२५

## अवैधरीत्या गांजा (अंमली पदार्थ) ची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई ,२किलो गांजा जप्त, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :—दिनांक २३/०४/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फतीने खबर मिळाली की, एक इसम मोपेड गाडीच्या डिक्कीत अवैधरित्या गांजाची वाहतुक करीत आहे. सदर मोपेड घेवुन आरोपी बायपास चौकातुन मोहपा रोडकडे येत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मोहपा रोड ड्रिमसिटीकडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी केली असता संशयीत मोपेड मो.सा. क्रंमाक एम.एच ४० बी.एक्स ७८०१ मिळुन आली. नमुद मोपेड चालकाला ताब्यात घेवुन नावपत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **सचिन छत्रपती बावणे, वय ३०वर्ष ,रा. जोगीठाणा पेठ, उमरेड असे सांगितले.**पोलीसांनी पंचासमक्ष त्याच्या मोपेड मो.सा. क्रंमाक एम.एच ४० बी.एक्स ७८०१ची झडती घेतली असता त्यात गांजा मिळुन आला. पोलीसांनी एकुण **२ किलो गांजा किंमती २२,०००/— रूपये आणि** मोपेड मो.सा. क्रंमाक एम.एच ४० बी.एक्स. ७८०१ किंमती ३०,०००/— रूपये **असा एकुण किंमती ५२,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**आरोपीसचिन छत्रपती बावणे, वय ३० वर्ष ,रा. जोगीठाणा पेठ, उमरेड याचे विरुध्द पोस्टे उमरेड येथे येथे कलम २२,२२,२९ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**